सन २०१९-२० या आर्थिक वर्षामध्ये अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या धर्तीवर समकक्ष योजना व इतर योजना राबविण्याकरिता ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर) साठी निधी वितरीत करण्यास मंजूरी....
महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ (मर्यादित)

महाराष्ट्र शासन
इमाव, सा.व शै.मा.प्र., विजाभज व विमाप्र कल्याण विभाग,
शासन निर्णय क्रमांक : पूरक-२०१९/प्र.क्र.७७/महामंडळे
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १६ सप्टेंबर,२०१९

संदर्भ :- १) शासन निर्णय, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग क्र.इमाव २०१८/प्र.क्र.९०/ महामंडळे, दि.२८ जानेवारी, २०१९.
२) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि.०८ जुलै, २०१९.

शासन निर्णय

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या धर्तीवर समकक्ष योजना (१) बँकेमार्फत घेतलेल्या वैयक्तिक कर्जावरील व्याज परतावा योजना (रुपये १०.०० लाखापर्यंत), (२) बँकेमार्फत घेतलेल्या गट कर्ज व्याज परतावा योजना (रुपये १०.०० लाख ते रु. ५०.०० लाखापर्यंत) आणि (३) कोकण विभागाकरिता असलेल्या शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग विकास महामंडळामार्फत वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना व गट कर्ज व्याज परतावा योजना व इतर योजना राबविण्यासाठी महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळास रुपये २५०.०० कोटी सहायक अनुदान मंजूर करण्यास संदर्भ क्र.१ येथे नमूद दि.२८ जानेवारी, २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर योजनेसाठी पावसाळी अधिवेशन, २०१९ मध्ये नवीन बाब क्र.५२ अन्वये रु.५.०० कोटी व पूरक मागणी बाब क्र.२२२ अन्वये रु.९५.०० कोटी एवढी तरतूद अर्थसंकल्पित करण्यात आली आहे. सदर तरतुदीमधून संदर्भ क्र.२ येथे नमूद दि.०८ जुलै, २०१९ रोजीच्या परिपत्रकान्वये एकूण मंजूर अनुदानाच्या ६० टक्के मर्यादेत रु.६०.०० कोटी (रुपये साठ कोटी फक्त) एवढे सहायक अनुदान खालील अटींच्या अधीन राहून वितरीत करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

१. योजनांतर्गत निधीतील खर्चासाठी शासनाने ठरविलेले निर्बंध काटेकोरपणे अंमलात आणावेत. तसेच, ज्या योजनेसाठी निधी मंजूर करण्यात आला आहे, त्याच योजनेसाठी निधी खर्च करण्यात यावा.

२. व्यवस्थापनावरील खर्च मर्यादित ठेवण्याच्या दृष्टीने कामकाजात सुसूत्रता आणावी.

३. विविध बाबींवर खर्च केलेल्या रकमांची तपशीलवार माहिती व त्यावर केलेला खर्च याची सविस्तर माहिती शासनास सादर करावी.

४. कार्यालयीन खर्चात काटकसर करावी.

५. महामंडळाने कर्जाच्या वसुलीचे प्रमाण प्रभावीपणे राबविण्यासाठी प्रयत्न करावेत.

६. सदर योजनेचा निधी उपयोगिता प्रमाणपत्रे तपासण्याच्या अधीन वितरीत करण्यात येत आहे.

७. उपरोक्त निधीचा खर्च करतांना संबंधित अधिकाऱ्यांनी सर्वसाधारण वित्तीय नियम, योजनेच्या अटी व शर्ती, CVC मार्गदर्शक सूचना, CAG निरीक्षणे इ. अनुपालन करून निधीचा विनियोग करावा.

८. संदर्भ क्र.२ येथे नमूद दि.०८ जुलै, २०१९ रोजीच्या परिपत्रकातील प्रत्येक अटींची पूर्तता महामंडळाकडून करण्यात यावी.

०२. वरील अनुदानाबाबत सह सचिव/ उप सचिव (अर्थसंकल्प), इमाव, सा.व शै.मा.प्र., विजाभज व विमाप्र कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई हे नियंत्रक अधिकारी राहतील. सदर अनुदानाची रक्कम आहरित करण्यासाठी कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), इमाव, सा.व शै.मा.प्र., विजाभज व विमाप्र कल्याण विभाग यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे. त्यांना सदर अनुदान म.को.नि.४४ मधील नमुन्यातील देयकान्वये महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळास संवितरीत करण्याचे अधिकार देण्यात येत आहेत.

०३. आयसीआयसीआय बँकेमार्फत यासाठी नवीन पोर्टल सुरु करण्यात आले आहे. त्यामुळे ही रक्कम आयसीआयसीआय बँकेत वेगळे बँक खाते उघडून त्यात वेगळी ठेवावी आणि फक्त या योजनेच्या व्याज परताव्यासाठीच वापरावी. इतर कोणत्याही प्रयोजनासाठी या निधीचा वापर करता येणार नाही, याची दक्षता घ्यावी.

०४. या बाबीवरील खर्च मागणी क्र. झेडजी-३, २२२५, अनुसूचित जाती, अनुसचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्यांक यांचे कल्याण, ०३, मागासवर्गीयांचे कल्याण, १०२, आर्थिक विकास, (०१) विमुक्त जाती भटक्या जमाती इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग यांचे कल्याण, (०१) (०५) महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळास सहायक अनुदान (कार्यक्रम) (२२२५ एफ २५४), ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर) या लेखाशीर्षाखली खर्ची टाकून सन २०१९-२० या आर्थिक वर्षाच्या मंजूर तरतूदीतून भागवावा.

०५. हा शासन निर्णय वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र.५२५/२०१९/व्यय-१४, दि.१३ सप्टेंबर, २०१९ अन्वये वित्त विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

०६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९१६१४२६०५७०२२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Bhaurao
Raghunath Gavit

Digitally signed by Bhaurao Raghunath Gavit
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=VJNT OBCS SBC Welfare Dept., postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=692454783803b1bf08be0ff2505a01eb578c61edfbb827457be5704f5b440067, serialNumber=950bc6a64b0801087d4b403d7351619557bcd3489ca14b4e0f644bf05a04e89c, cn=Bhaurao Raghunath Gavit
Date: 2019.09.16 14:38:36 +05'30'

(भा. र. गावित)
सह सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत :

१. सह सचिव /उप सचिव (अर्थसंकल्प), इमाव, सा.व शै.मा.प्र., विजाभज व विमाप्र कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई.

२. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ, मुंबई.
३. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखापरिक्षा/लेखा अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर.
४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
५. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
६. वित्त विभाग (कार्यासन व्यय-१४/अर्थसंकल्प-५) मंत्रालय, मुंबई.
७. नियोजन विभाग (कार्यासन १४१३), मंत्रालय, मुंबई.
८. सह संचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासन भवन, ५वा मजला, मुंबई.
९. कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), इमाव, सा.व शै.मा.प्र., विजाभज व विमाप्र कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. स्वीय सहायक, प्रधान सचिव (इमाव, सा.व शै.मा.प्र., विजाभज व विमाप्र कल्याण) यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई.
११.निवडनस्ती (महामंडळे).

*****